**दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, सांगोला यांचे न्यायालयात**

**नियमित दिवाणी मुकदमा नं. १९१/२०१४**

**निशाणी ८० लगत आदेश**

( रुक्मीणी विरुध्द प्रल्हाद व इतर)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. १४ हा दावा दाखल करतेवेळी सज्ञान असल्याबात आवश्यक ती दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांनी अर्जात असे कथन केले आहे की, सदर दावा वादीने प्रतिवादी विरुध्द सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दावा दाखल करतेवेळी प्रतिवादी क्र. १४ हा अज्ञान होता, परंतु अनवधानाने दावा तयार करताना प्रतिवादी क्र. १४ हा सज्ञान असे लिहीले गेले आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र. १४ हा नि. क्र. ७० वरती स्वतः हजर झाला आहे व दाव्यास कैफियत देण्यास विलंब झाला आहे असा अर्ज दिला आहे. त्यावरुन दावा दाखल करताना प्रतिवादी क्र. १४ हा अज्ञान असल्याची माहिती वादीस मिळाली आहे. त्यामुळे सदरची बाब अभिलेखावर येण्यासाठी अर्ज केलेला आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दिले आहे व वादींचा अर्ज नाकारला आहे. प्रतिवादीचे कथन की, वादी यांना प्रतिवादी क्र. १४ हा अज्ञान असल्याची

माहिती असूनही त्यांनी पुर्तता केली नाही. अर्जातून वादीची मागणी स्पष्ट होत नाही. करीता अर्ज नामंजूर करावा.

४. सदर अर्जाचे सुक्ष्मपणे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने दावा दाखल करतेवेळी प्रतिवादी क्र. १४ हा अज्ञान असताना अनावधानाने सज्ञान दाखवले आहे. सदरची बाब ही जवळपास १० वर्षापुर्वीची आहे. तद्नंतर प्रतिवादी क्र. ८ याने अभिलेखावरती प्रतिवादी क्र. १४ हा दावा दाखल करतेवेळी अज्ञान असल्याची बाब अभिलेखावर आणली. तुर्तास दावा हा बराच पुढे गेलेला आहे व प्रतिवादी क्र. १४ हा नि. क्र. ७० चे माध्यमातून स्वतः हजर झालेला आहे. त्यामुळे दाव्यात उद्भवलेली परिस्थिती व भविष्यात कोणतीही दावा गुणवत्तेवर चालत असताना तांत्रीक त्रुटी राहू नये म्हणून जर वादीस सदरची दुरुस्ती करण्याची संधी दिली तर प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी सदरचा दावा हा गुणवत्तेवर चालण्याकामी उभय पक्षकारांना मदतच होणार आहे. त्याचवेळी प्रतिवादी क्र १४ यांनासुध्दा त्यांची लेखी कैफियत मांडून त्यांचा बचाव घेण्याची संधी मिळणार आहे. वादीने केलेल्या विलंब निश्चितपणे दिर्घ कालावधीचा आहे. त्याबाबत वादीवर आर्थिक भुर्दंड लादणे गरजेचे आहे. सबब, वरील सर्व बाबींचा विचार करता, वादीस संधी देवून दाव्यात निर्माण केलेली त्रुटी दुरुस्ती करण्याची संधी दिल्यास उभय पक्षकारांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.–

## आदेश

१. अर्ज वादी यांनी **रु. १०००/–** दंड देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी रु. १०००/– शासन नावे न्यायालयात जमा करावेत.

३. वादी यांना अर्जात नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १४ बाबत आवश्यक ती दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते.

सांगोला.
दिनांक – २६/११/२०२४.

(श्री. संजय मो. घुगे)
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.